## व्यक्तीपरिचय

# डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले



महाराष्ट्रातील होमिओपॅथीचे आद्य प्रसारक आणि महाराष्ट्राला परिचित असणाऱ्या सुप्रसिद्ध श्रीकृष्ण होमिओ फार्मसी चे जनक डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले यांचे घराचे मूळचे कोकणातील राजापूर नजिकच्या धोपेश्वरचे. पळसुले या गावचे खोत होते. ते पंधरा वर्षांचे असतानाच १८९५ साली त्यांच्या वडिलांचे आणि आईचे एळाद दुसऱ्या वर्षाच्या अंतराने निधन झाले.

वडील सदाशिवराव कोल्हापूरच्या बडोदकरी राणीसाहेब यांच्या वाड्यावर राहायचे त्यामुळे डॉ. पळसुल्यांचे प्राथमिक, दुय्यम व प्रिव्हियसपर्यंतचे कॉलेज शिक्षण कोल्हापुरातच झाले. कोल्हापुरातच सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांच्याशी पळसुले कुटुंबाचा परिचय होता. पटवर्धन बुवा हे कलकत्याहून होमिओपॅथीचे शिक्षण व पदवी घेऊन आले होते. त्यांनीच डॉ. पळसुलेंना होमिओपॅथी आणि कलकत्त्याविषयी मार्गदर्शन केले. प्रिव्हियसची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांच्या चिंतामणराव या वडीलबंधुनी १९०५ साली त्यांना होमिओपॅथीचे शिक्षण घेण्यासाठी कलकत्त्यास पाठविले. परंतु डॉ. गोपाळ पळसुलेंनी नॅशनल मेडिकल कॉलेज मध्ये जाऊन ॲलोपॅथीचे शिक्षण घेऊन एल.एम.एस. ही पदवी संपादन केली. त्याच वेळेस त्यांनी होमिओपॅथीचा अभ्यासक्रम पूर्ण करून एल.एच.एम.एस. ही होमिओपॅथीचीही पदवी मिळवली. अशा प्रकारे वैद्यक शास्त्रातील दुहेरी यश संपादून ते १९१० साली कलकत्त्याहून परत आले.

त्या काळात बंगालमध्ये राजकीय चळवळ मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे दासबाबूंच्या आणि अरविंद घोषबाबूंच्या राजकारणाची छाप विद्यार्थी दशेतील डॉक्टरांवर विशेष पडली होती. १९११ साली पुण्याला आल्यानंतर त्यांनी टिळक पक्षात प्रवेश करून राजकीय कार्याला प्रारंभ केला.

डॉक्टर होऊन पुण्यात आल्यांनंतर चरितार्थासाठी डॉ. पळसुले आणि डॉ. दषोपंत पटवर्धन यांनी पुण्यात दवाखाना चालू केला. होमिओपॅथीचा दवाखाना सुरू तर झाला, परंतु त्यासाठी लागणारी औषधे ही परदेशातून मागवावी लागत होती. राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. गोपाळ पळसुले यांना ते खुपत होते. त्यातच त्यांना होमिओपॅथीबरोबर बाराक्षाराची औषधेही वापरावी लागत असत. म्हणून पुढे दवाखान्याच्या जोडीला बाराक्षार पद्धतीची औषधे तयार करणारा श्रीकृष्ण होमिओ फार्मसी हा कारखाना ११ जानेवारी १९११ रोजी पुण्यात सुरू केला.

१९१६ साली ते पुणे सार्वजनिक सभेचे प्रथम सदस्य झाले. नंतर चिटणीस, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष ही पदेही भूषविली. १९१६ साली त्यांच्याच अध्यक्षतेखाली त्यांनी भारत स्वयंसेवक मंडळाची स्थापना केली. लोकमान्य टिळक १९१४ साली मंडालेच्या तुरुंगातून सुटून आल्यानंतर टिळकांसोबत भारतभर फिरताना त्यांनी आणि त्यांच्या भारत स्वयंसेवक मंडळ या संस्थेने बरेच कामही केले. लोकमान्य टिळकांनी लोकजागणासाठी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव असो किंवा सार्वजनिक शिवजयंती उत्सव असो, सर्व कार्यक्रम सुरळीतपणे साजरे व्हावेत यासाठी या मंडळाचे स्वयंसेवक स्वतः हजर राहून शिस्तपालनाचे आणि सेवाभावाचे काम करीत असत. या संस्थेचा बोलबाला त्याकाळी सर्वसामान्यांपर्यंत तसेच राजकीय कार्यकत्यांत बराच पोहोचला होता.

१९२० साली नागपूर येथे भरलेल्या इंडियन नॅशनल काँग्रेस च्या अधिवेशनात डॉ. पळसुलेंनी स्थापन केलेल्या भारत स्वयंसेवक मंडळाने भरीव काम केले होते. त्या वेळेस या संस्थेचे अध्यक्षपद हे डॉ. लक्ष्मण व्ही परांजपे यांच्याकडे, तर उपाध्यक्षपद डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्याकडे होते. डॉ. हेडगेवारांनी या संघटनेचे कामकाज जवळून पाहिले आणि ते या संकल्पनेने खूपच प्रभावित झाले.

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे वैद्यकीय शिक्षणही १९१० सालात कलकत्त्याच्या त्याच नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये सुरू झाले आणि तेथेच त्यांचाही **पान क्र. १२ वर**



## व्यक्तीपरिचय

## गोपाळ सदाशिव पळसुले

**पान क्र. ११ वरून**

विद्यार्थ्यांच्या राजकीय चळवळीशी आणि काँग्रेसशी संबंध आला होता. टिळकांच्या निधनानंतर जेव्हा काँग्रेस पक्षातील नेत्यांचे मतभेद वाढू लागले, त्याच वेळेस इंग्रजांनी भारतातील हिंदू मुस्लिम वादाला खतपाणी घातले आणि हिंदू मुस्लिम दंगे भडकू लागले. काँग्रेसमध्येही तेव्हा हिंदू सेवक संघ, भारत सेवक समाज, सर्व्हन्टस् ऑफ इंडिया यासारख्या छोट्या छोट्या संघटना काम करू लागल्या होत्या. यातील काही कट्टर हिंदुत्ववादी होते.

१९२५ साली डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आणि आता देशभर पसरलेल्या या संघटनेची खरी सुरूवात ही डॉ. पळसुलेंनी १९१६ साली सुरू केलेल्या या भारत स्वयंसेवक मंडळानेच झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. डॉ. हेडगेवार यांच्या संस्थेचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नाव आणि त्यांच्या या संघटनेचा आणि स्वयंसेवकांच्या कार्यशैलीचा विचार करता वरील तर्कसंगती पटायला काहीच हरकत नाही.

१९२२ साली डॉ. गोपाळ पळसुले यांना मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल तीन महिने कारावासही भोगावा लागला होता, तर १९३२ च्या चळवळीत त्यांना सहा महिने येरवडा आणि नंतर नाशिक कारागृहात ठेवण्यात आले होते. १९३३ साली सुटून आल्यानंतर त्यांनी १९४३ पर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकरांबरोबर हिंदुमहासभेचे देखील कार्य केले.

त्याच काळात त्यांनी होमिओपॅथीच्या प्रॅक्टिसकडे दुर्लक्ष न करता होमिओपॅथी ग्रंथ लेखन आणि औषधे बनविण्याचा कारखाना व त्यांची विक्री याबरोबरच त्यांचा वैद्यकीय व्यवसायही चालू होता.

१९३७ साली पहिले काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर मुंबई प्रांतामध्ये ॲलोपॅथी, आयुर्वेद आणि युनानी या व्यतिरिक्त इतर सर्व, प्रामुख्याने होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांना त्यांचा व्यवसाय करण्यास प्रतिबंध आणला गेला. त्यावेळचे आरोग्यमंत्री डॉ. गिल्डर यांनी हे वैद्यक नोंदीतील विधेयक विधिमंडळापुढे आणले होते. होमिओपॅथीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ५ जून १९३८ रोजी मुंबई प्रांतातील पहिली होमिओपॅथी परिषदेचे सर्वेसर्वा डॉ. गोपाळ पळसुले होते. अतःपासून इतिपर्यंतचा सर्व कार्यक्रम त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाला. एकीकडे आपले वैद्यकीय कार्य सुरू ठेवतानाच त्यांनी आपल्या सामाजिक कार्याकडे दुर्लक्ष केले नाही. ते सुरूच होते. साहजिकच त्यांच्या भारत स्वयंसेवक मंडळाच्या प्रभावातून डॉ. हेडगेवारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली असावी, असे म्हणण्यास वाव आहे.

## पटतय का पहा

**राजकारणी**
**सहसा सत्य न बोलणे**
**नित्य टोपी बदलणे**
**मी असे बोललोच नव्हतो**
**असे बोलणे**
**तोच मुरब्बी राजकारणी**
**ऐसे जाणावे**



## पटतय का पहा

**पक्ष प्रवक्ता**
**जो वक्ता**
**ज्यासी दडपून बोलण्याचा**
**मक्ता।।**
**तोची पक्ष प्रवक्ता**
**हे ची जाणावे**
**चतुर माणसाने**



**य.वी. हर्डीकर**
**(९३७३५९९०८४)**


।। रेशीम गांठी ।।®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समूपदेशन

वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे